दिनांक २९/०६/२०१९

# प्रेसनोट

**आलोसे नारायण दत्तु गरड वय ५७ वर्षे, पद पोलीस नाईक ब.नं ७६९ वर्ग—३ नेमणुक पोलीस स्टेशन गांधी चौक, लातूर. रा.बुधोडा ता.औसा जि.लातूर यांनी २०००/—रुपये लाचेची मागणी करुन तडजोडीअंती पंचासमक्ष १,५००/— रुपये लाच स्वत: स्विकारली म्हणुन गुन्हा दाखल.**

यातील तक्रारदार यांचेवर मा.सत्र न्यायालय, लातूर यांच्याकडुन कलम ३०७ भादंवि मध्ये अजामीनपात्र वॉरंट (NBW) निघाले होते. पोलीस नाईक गरड यांनी त्या.वॉरंटमध्ये तक्रारदारास काल दिनांक २८.०८.२०१९ रोजी अटक केली व त्याला पोलास कोठडीत न ठेवता तात्काळ मा.न्यायालयात हजर केले. म्हणुन मदत केल्याचे कामाचे बक्षीस म्हणुन तक्रारदारास २०००/— रुपये लाचचे मागणी केली व लाचेची रक्कम देईपर्यत तक्रारदाराचा मोबाईल स्वत:कडे ठेवुन घेतला. आशा आशयाची तक्रार आज दिनांक २९.०६.२०१९ रोजी लाच लुचपत प्रतिबंध विभाग, लातूर या कार्यालयात प्राप्त झाली होती.

तक्रारदार यांचे तक्रारीच्या अनूषंगाने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर कार्यालयाकडून दिनांक २९/०६/२०१९ पंचासमक्ष लाचेच्या मागणीची पडताळणी केली असता लोकसेवक पोलीस नाईक गरड यांनी २,०००/— रुपये लाचेची मागणी करुन तडजोडीअंती १५००/— रुपये पंचासमक्ष लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

आज २९/०६/२०१९ रोजी १५.५६ वाजता चित्तीकिरण लॉज शिवाजी चौक रोड लातूर येथे पोलीस नाईक गरड यांनी मागणी केलेली लाचेची रक्कम घेवुन तक्रारदार यांना देण्यास पाठविले असता लोकसेवक पोलीस नाईक नारायण दत्तु गरड यांनी लाचेची रक्कम १,५००/—रुपये पंचासमक्ष स्वत: स्विकारली म्हणुन त्यांना रंगेहात पकडण्यात आले.

त्यांचे विरूध्द पोलीस ठाणे शिवाजी नगर, लातूर येथे भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम (संशोधन) २०१८ अन्वये गुंन्हा दाखल करण्याची प्रक्रीया चालु आहे.

पुढील तपास पोलीस उपअधीक्षक माणिक बेद्रे लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर हे करीत आहेत.

सदरची सापळा कार्यवाही पोलीस अधिक्षक श्री. संजय लाटकर, अपर पोलीस अधिक्षक श्रीमती अर्चना पाटील यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उप अधिक्षक माणीक बेद्रे, पोलीस निरीक्षक कुमार दराडे, पोह/लक्ष्मीकांत देशमुख, पोना/चंद्रकांत डांगे, माहेन सुरवसे, मपोना/शिवकांता शेळके, पोकॉ/शैलेश सुडे, सचिन धारेकर, दत्ता विभुते, आशिष क्षीरसागर, संतोष गिरी, शिवशंकर कच्छवे मपोशि/रुपाली भोसले चापोना/राजु महाजन यांनी पार पाडली आहे.

तरी सर्व नागरीकांना आवाहन करण्यात येते की, शासकीय अधिकारी/कर्मचारी हे शासकीय काम करण्यासाठी लाचेची मागणी करीत असल्यास तसेच त्यांचे लाचेच्या मागणीसंदर्भात मोबाईल फोनवर अधिकारी/कर्मचारी (लोकसेवक) यांचे एसएमएस किंवा व्हिडीओ, ऑडीओ क्लिप असल्यास, भ्रष्टाचार संबंधाने काही माहीती असल्सास किंवा शासकीय अधिकारी/कर्मचारी यांनी शासकीय निधीचा भ्रष्टाचार केला असेल तर खालील क्रमांकावर संपर्क करावा.

१) मा.श्री.संजय लाटकर पोलीस अधीक्षक, ला.प्र.विभाग, नांदेड परिक्षेत्र, नांदेड. मोबाईल क्रमांक ९९२३०२८१२२
२) माणिक.बेद्रे, पोलीस उप अधिक्षक :— मोबाईल क्रमांक ९९२३६६६६४४
३) पोलीस निरीक्षक कुमार दराडे :— मोबाईल क्रमांक ९६५७७०९८४१
४) टोल फ्री हेल्पलाईन क्रमांक :— १०६४
५) कार्यालयाचा फोन क्रमांक :— ०२४८२—२४२६७४७
६) Website :— www.acbmaharashtra.gov.in
७) Mobile App :— www.acbmaharashtra.net
८) Facebook Page :— www.facebook.com/MaharashtraACB

( माणिक बेद्रे )
पोलीस उप अधिक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर

पोलीस उपअधिक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग लातूर

Scanned by CamScanner